ePaper

मणिपूरमध्ये सैन्याच्या तापयाची गाडी नदीत कोसळली; अपघातात कॅप्टन शहीद

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

आदिवासी कुटुंबांच्या मदतीला नगरसेवक बोऱ्हाडे धावले!

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 19 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

लाखो कामगारांच्या हक्कांना मिळणार बळ व कायदेशीर संरक्षण

राज्यात नवे वेतन नियम लागू

महाईन्यूज । मुंबई

राज्यातील कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या वेतन हक्कांना अधिक कायदेशीर संरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र वेतन नियम २०२६ लागू करण्यात आले आहेत. ५ नोव्हेंबरपासून या नियमांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यामुळे कामाचे तास, साप्ताहिक सुट्टी, ओव्हरटाइम, वेतन कपात आणि वेतन चिठ्ठी यासंदर्भातील नियम अधिक स्पष्ट करण्यात आले आहेत. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी याबाबत माहिती दिली.

नवीन नियमांनुसार, दिवसाला आठ तास काम आणि आठवड्याला जास्तीत जास्त ४८ तास कामाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याला साप्ताहिक विश्रांती देणे बंधनकारक असेल. विश्रांतीच्या दिवशी कामावर बोलावल्यास संबंधित कर्मचाऱ्याला दुप्पट दराने ओव्हरटाइम वेतन द्यावे लागणार आहे. त्यामुळे अतिरिक्त कामाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होणार आहे.

वेतन कपातीबाबतही महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. कर्मचाऱ्याच्या एकूण वेतनातून होणारी कपात ५० टक्क्यांपेक्षा अधिक करता येणार नाही. तसेच वेतन कपात करण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची आणि स्पष्टीकरण देण्याची संधी देणे नियोक्त्याला बंधनकारक असेल. यामुळे मनमानी वेतन कपातीला आळा बसण्याची अपेक्षा आहे.

नवीन नियमांनुसार, आस्थापनांना कर्मचाऱ्यांच्या वेतन उपस्थितीच्या नोंदी किमान पाच वर्षे जतन कराव्या लागणार आहेत. तसेच वेतन देण्याच्या दिवशी किंवा त्यापूर्वी प्रत्येक कर्मचाऱ्याला वेतन चिठ्ठी (सॅलरी स्लिप) देणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे वेतन, विविध कपाती आणि प्रत्यक्ष मिळणारी रक्कम यांचा तपशील कर्मचाऱ्यांना समजू शकणार आहे.

किमान वेतन न मिळणे, ओव्हरटाइमचा मोबदला न देणे तसेच वेतनामध्ये लिंगभेद करणे अशा प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांना तक्रार दाखल करता येणार आहे. वेतनासंदर्भातील अन्यायाविरोधात दाद मागण्याची सुविधाही या नियमांमुळे उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र किमान वेतन नियम १९६३ आणि वेतन प्रदान नियम १९६३ अधिक्रमित करून त्यांच्या जागी नवीन वेतन नियम २०२६ लागू करण्यात आले आहेत. या नियमांमुळे कामगारांचे वेतन हक्क, कामाच्या अटी आणि वैधानिक लाभांचे संरक्षण अधिक मजबूत होईल, असा विश्वास कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी व्यक्त केला आहे.

प्रत्येक कर्मचाऱ्याला वेतन चिठ्ठी देणे बंधनकारक!

नवीन नियमांमुळे आस्थापनांच्या जबाबदाऱ्याही वाढल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि उपस्थितीच्या नोंदी किमान पाच वर्षे जतन करणे आवश्यक करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याला वेतन देण्याच्या दिवशी किंवा त्यापूर्वी वेतन चिठ्ठी अर्थात सॅलरी स्लिप उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना मूळ वेतन, विविध भत्ते, कपाती आणि प्रत्यक्ष मिळणारी रक्कम यांचा स्पष्ट तपशील उपलब्ध होणार आहे.



कामगारांच्या तक्रारींसाठी कायदेशीर आधार!

किमान वेतन न मिळणे, अतिरिक्त कामाचा मोबदला न देणे किंवा वेतनात लिंगाच्या आधारावर भेदभाव होणे अशा प्रकरणांमध्ये कामगारांना संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागता येणार आहे. नवीन नियमांमुळे तक्रारींच्या निवारणासाठी निश्चित प्रक्रिया उपलब्ध होणार असून, कामगारांच्या हक्कांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, 'महाराष्ट्र किमान वेतन नियम-१९६३' आणि 'महाराष्ट्र वेतन प्रदान नियम-१९६३' यांच्या जागी नवीन वेतन नियम लागू करण्यात आले आहेत. केंद्र सरकारच्या वेतन संहिता-२०१९ अंतर्गत राज्य सरकारने हे नियम अधिसूचित केले आहेत. वेतन निश्चिती, कामाचे तास, साप्ताहिक विश्रांती, वेतन कपात आणि नोंदी ठेवण्यासंदर्भात एकसमान कार्यपद्धती निर्माण करणे हा या निर्णयामागील उद्देश आहे. नवीन नियमांमुळे राज्यातील कामगारांच्या वेतन हक्कांचे संरक्षण अधिक मजबूत होईल आणि कामगार व नियोक्ता यांच्यातील व्यवहारात पारदर्शकता येईल, असा विश्वास कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केला आहे.

वेतन कपातीवर लगाम; मनमानी करणाऱ्या मालकांना चाप!

कामगारांच्या वेतनातून होणाऱ्या कपातीबाबतही राज्य सरकारने महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. नियमानुसार वेतनातून करण्यात येणाऱ्या एकूण कपातीची मर्यादा ५० टक्के निश्चित करण्यात आली आहे. तसेच दंडात्मक कपातीसंदर्भात संबंधित कर्मचाऱ्याला आपली बाजू मांडण्याची संधी देण्याची तरतूद आहे. यामुळे वेतन कपातीच्या प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून, कामगारांच्या आर्थिक हिताचे संरक्षण होण्यास मदत होणार आहे.



४०० कोटींची थकबाकी, १३ कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या

मुंबई उच्च न्यायालयाचे कठोर आदेश; सिंहगड संस्थेची चौकशी!

महाईन्यूज । पुणे

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या (एसटीईएस) ४४ शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ४०० कोटी रुपयांहून अधिक वेतन व निवृत्तीविषयक लाभ थकविल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. या संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), सक्तवसुली संचालनालय (ईडी) आणि प्राप्तिकर विभागामार्फत चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच संस्थेची आणि विश्वस्तांची बँक खाती व गुंतवणूक गोठविण्यासह मालमत्तांची विक्री आणि हस्तांतरण करण्यास मनाई केली आहे.



१९ नोव्हेंबरला अहवाल

सिंहगड संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची प्राथमिक चौकशी सुरू करण्यात आली आहे. या चौकशीचा अहवाल १९ नोव्हेंबर २०२६ पर्यंत न्यायालयात सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत एम. सेठना यांच्या विशेष खंडपीठासमोर संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या याचिकांवर सुनावणी झाली. गेल्या जवळपास आठ वर्षांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीविषयक देणी थकीत असल्याचे सुनावणीदरम्यान समोर आले. विशेष म्हणजे, संस्थेच्या ४४ शैक्षणिक संस्था नियमित सुरू असून प्रवेश प्रक्रियाही सुरू आहे. असे असतानाही कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नसल्याबद्दल न्यायालयाने तीव्र आश्चर्य व्यक्त केले.

वेतनाअभावी अनेक कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून, अन्न आणि वैद्यकीय उपचारांसाठीही पैसे नसल्याची गंभीर परिस्थिती असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या काळात सुमारे १३ कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाबही सुनावणीदरम्यान मांडण्यात आली.

थकीत वेतन आणि निवृत्तीविषयक देणी देण्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्तांनी न्यायालयात ६० कोटी ६५ लाख रुपये भरण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनानुसार एक रुपयाचाही भरणा करण्यात आला नसल्याचे स्पष्ट झाले. न्यायालयाला दिलेल्या हमीचे पालन न केल्याबद्दल खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली. संस्थेच्या ४४ शैक्षणिक संस्था सुरू असतानाही कर्मचाऱ्यांचे वेतन थकविण्यात आल्याने संस्थेचा निधी अन्य व्यवसायांकडे किंवा परदेशात वळविण्यात आला आहे का, अशी शक्यता न्यायालयाने व्यक्त केली. आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्डरिंग झाले आहे का, याची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता न्यायालयाने अधोरेखित केली. त्यानुसार सीबीआय, ईडी आणि प्राप्तिकर विभागाला चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी (पीएफ) प्राधिकरणालाही संस्थेने कर्मचाऱ्यांबाबतच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत का, याची तपासणी करण्यास सांगितले आहे.

चौकशी पूर्ण होईपर्यंत संस्थेची आणि विश्वस्तांची बँक खाती व गुंतवणूक गोठविण्यात येणार आहे. तसेच स्थावर व जंगम मालमत्तांची विक्री, हस्तांतरण आणि समभागांच्या व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. संस्थांना यापूर्वी देण्यात आलेले न्यायालयीन संरक्षणही उठविण्यात आले आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाने संस्थांचा ताबा घेण्याबाबत किंवा विद्यार्थ्यांना अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये सामावून घेण्याबाबत निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तांत्रिक शिक्षण संस्थांचा कारभार प्रशासकांनी हाती घेण्याबाबतही आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणाचा प्राथमिक चौकशी अहवाल १९ नोव्हेंबर रोजी न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

६० कोटींचे आश्वासनही अपूर्ण

थकीत वेतन आणि निवृत्तीविषयक देणी देण्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्तांनी न्यायालयात ६० कोटी ६५ लाख रुपये भरण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनानुसार एक रुपयाही जमा करण्यात आला नसल्याचे स्पष्ट झाले. न्यायालयाला दिलेल्या हमीचे पालन न केल्याबद्दल खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

१३ कर्मचाऱ्यांच्या आत्महत्येचा उल्लेख

वेतन न मिळाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून, अन्न आणि वैद्यकीय उपचारांसाठीही पैसे नसल्याची परिस्थिती असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या काळात सुमारे १३ कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाबही सुनावणीदरम्यान मांडण्यात आली. या गंभीर परिस्थितीची न्यायालयाने दखल घेतली.

सभागृहात गदारोळ, रस्त्यावर बुलडोझर; आयुक्तांची अतिक्रमणांवर धडक!

महाईन्यूज । पुणे

गोखले रस्त्यावरील (नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता) वाढत्या अतिक्रमणांवर कारवाई होत नसल्याने महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई सुरू केली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम स्वतः रस्त्यावर उतरल्याने कारवाईला वेग आला. या मोहिमेत सुमारे २४ हजार ५०० चौरस फुटांवरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली.



नगरसेवकांनी सभागृहात अतिक्रमणांच्या प्रश्नावर प्रशासनाला जाब विचारल्यानंतर आयुक्त राम यांनी अतिक्रमण विभागाला तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार शिवाजीनगर आणि गोखले रस्ता परिसरात दुपारी तीनच्या सुमारास कारवाईला सुरुवात झाली. अनधिकृत हॉटेल, कपड्यांची दुकाने, पक्की बांधकामे, हातगाड्या आणि पथाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. आयुक्तांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साह्याने अतिक्रमणे हटविण्यात आली. दुपारी सुरू झालेली ही मोहीम रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

कारवाईची चाहूल लागताच काही व्यावसायिकांनी विक्रीचे साहित्य जवळच्या दुकानांमध्ये आणि खोल्यांमध्ये लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आयुक्तांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर त्यांनी साहित्य लपवून ठेवलेल्या खोलीलाच टाळे ठोकण्याचे निर्देश दिले. आयुक्त स्वतः कारवाईवर लक्ष ठेवून असल्याने अतिक्रमणधारकांमध्ये धावपळ उडाली. अनेक व्यावसायिकांनी कारवाईच्या भीतीने रस्त्यावर येणे टाळले. त्यामुळे सायंकाळी या रस्त्यावरील पदपथ नागरिकांना चालण्यासाठी मोकळे झाल्याचे चित्र दिसले.

दरम्यान, कारवाई थांबविण्यासाठी काही लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या नातेवाईकांकडून दबाव आणल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, कारवाईला विरोध करून अतिरिक्त आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली होती. कारवाई थांबविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना फोनही करण्यात आल्याचे समजते. ही बाब आयुक्तांच्या कानावर गेल्यानंतर त्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून कारवाईची देखरेख केली. मात्र, या दबावाच्या दाव्यांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

दुसरीकडे, महापालिकेची कारवाई दुपारी सुरू करण्याऐवजी सायंकाळच्या गर्दीच्या वेळी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. कारण या रस्त्यावर सायंकाळी पथारी व्यावसायिकांची संख्या वाढते. महापालिकेचे पथक आल्यावर विक्रेते पळून जातात आणि कारवाई संपल्यानंतर पुन्हा त्याच जागी व्यवसाय सुरू करतात. शनिवार आणि रविवारीही या परिसरात मोठी गर्दी असते. त्यामुळे केवळ एकदाच कारवाई करून उपयोग नाही; अतिक्रमणांवर नियमित आणि सातत्याने कारवाई करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ही मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

आदिवासी कुटुंबांच्या मदतीला नगरसेवक निखिल बोऱ्हाडे धावले!

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवाभावी उपक्रम; ४५० कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

राजकीय नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त हार-तुरे, पुष्पगुच्छ आणि होर्डिंग्जवर होणाऱ्या खर्चाला फाटा देत समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याचा आदर्श भाजपा 'क' प्रभाग अध्यक्ष तथा नगरसेवक निखिल बोराडे यांनी घालून दिला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत बोऱ्हाडे यांनी दुर्गम आदिवासी भागातील ४५० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटच्या माध्यमातून मदत करण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी ३९० किटचे वाटप पूर्ण झाले आहे.





"आमदार महेशदादा लांडगे यांनी नेहमीच राजकारणापेक्षा समाजकारणाला आणि जनसेवेला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार-तुरे आणि होर्डिंग्जवर खर्च करण्याऐवजी दुर्गम आदिवासी भागातील गरजू कुटुंबांना मदत करण्याचा निर्णय घेतला. टोकावडे, शिरगाव आणि मंदोशी येथील ४५० कुटुंबांपर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या किट पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे. त्यापैकी ३९० किटचे वाटप पूर्ण झाले आहे. समाजातील शेवटच्या घटकाच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करणे, हीच आमच्या नेत्याला वाढदिवसाची खरी भेट आहे. यापुढेही सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी आम्ही सदैव तत्पर राहू."

- निखिल बोऱ्हाडे, भाजपा 'क' प्रभाग अध्यक्ष तथा नगरसेवक.

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांचा २७ नोव्हेंबर रोजी वाढदिवस आहे. यानिमित्त वाढदिवसाचा उत्सव केवळ शुभेच्छा, सत्कार आणि प्रसिद्धीपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी आदिवासी भागातील गरजू कुटुंबांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला.

टोकावडे, शिरगाव आणि मंदोशी या गावांमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या ४५० किटचे वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचावी, यासाठी बोऱ्हाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नियोजन केले.

विशेष म्हणजे, राजकीय आणि सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना केवळ आपल्या प्रभागापुरते मर्यादित न राहता दुर्गम आदिवासी भागातील कुटुंबांच्या मदतीसाठी पुढे येण्याची भूमिका बोऱ्हाडे यांनी घेतली आहे. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून गरजूंच्या दैनंदिन गरजांना प्राधान्य देणारा हा उपक्रम ठरत आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या सेवाभावी अभियानात नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी घेतलेला पुढाकार लक्षवेधी ठरला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वळविण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. लोकप्रतिनिधींचे कार्य केवळ विकासकामांपुरते मर्यादित नसून समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या पाठीशी उभे राहणेही तितकेच महत्त्वाचे असल्याची भावना यातून अधोरेखित होत आहे.

ग्राहकांच्या नावावर सिमकार्ड; दुबईतील सायबर टोळीला पुरवठा!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

ग्राहकांच्या नावावर मोबाइल सिमकार्ड खरेदी करून ती ग्राहकांना न देता दुबईतील सायबर गुन्हेगारांना पुरविणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीने आतापर्यंत तब्बल १० ते १२ हजार सिमकार्ड दुबईत पुरविल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली असून, या सिमकार्डचा वापर विविध प्रकारच्या सायबर फसवणुकीसाठी केला जात असल्याचे उघड झाले आहे.



बनावट ॲपपासून बँक खात्यांपर्यंत वापर

या सिमकार्डचा वापर सायबर फसवणुकीसाठी फोन करण्यासह बनावट ॲपची नोंदणी, बँक खात्यांशी मोबाइल क्रमांक जोडणे आणि बनावट नावाने ई-मेल आयडी तयार करण्यासाठी केला जात होता. या सिमकार्डचा आणखी किती सायबर गुन्ह्यांमध्ये वापर झाला आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आव्हाड, उपायुक्त रोहिदास पवार आणि सहायक आयुक्त रोहिणी बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक रविकिरण नाळे, निरीक्षक दिगंबर गायकवाड, सहायक निरीक्षक प्रवीण स्वामी, वैभव पाटील, रोहित डोळस, सागर पोमण आणि प्रकाश कातकाडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

ओटीपी कालबाह्य झाल्याचा बहाणा

सिमकार्ड विक्रीच्या वेळी सूरज चिकवा आणि राजा कुमार ग्राहकांना ओटीपी कालबाह्य झाल्याचे किंवा सर्व्हर बंद असल्याचे सांगत असत. सिमकार्ड सक्रिय झाले नसल्याचा बहाणा करून ग्राहकांना ती दिली जात नव्हती. मात्र, प्रत्यक्षात ही सिमकार्ड दुबईतील सायबर गुन्हेगारांपर्यंत पोहोचवली जात होती.

पिंपरी-चिंचवड सायबर पोलिस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ४२/२०२६ च्या तपासादरम्यान पोलिसांनी तुषार अमराम चौधरी (२९, चिखली) आणि आदर्श संतोष वाघमारे (२७, आकुर्डी) यांना अटक केली. तुषार हा फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी बँक खाते पुरवत होता, तर आदर्श बँक व्यवहार हाताळत होता. त्यांच्या चौकशीत सुमंत ऊर्फ नानू रवींद्र दसरे (२६, निगडी प्राधिकरण) याचे नाव समोर आले.

सुमंत हा दुबईत एका चिनी नागरिकाच्या साथीने सायबर फसवणुकीचे गुन्हे करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याला भारतात आणण्यासाठी पोलिसांनी लुकआऊट सर्क्युलर (एलओसी) जारी करून इंटरपोलची मदत घेतली. त्यानंतर मुंबई विमानतळावर सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण स्वामी यांच्या पथकाने त्याला अटक केली.

सुमंतला सायबर गुन्ह्यांसाठी आवश्यक सिमकार्ड मनीष अशोकलाल वाधवा (४४, अंबरनाथ पूर्व) आणि महेश कन्हैयालाल चौइथरामानी (६०, कल्याण पश्चिम) यांच्यामार्फत पुरवली जात होती. या दोघांनाही पोलिसांनी अटक केली. त्यांच्या पासपोर्टच्या तपासणीत दुबईच्या २५ ते ३० फेऱ्या केल्याचे समोर आले. पुढील तपासात सूरज मुन्नालाल चिकवा (३२, विक्रोळी) आणि राजा अशोक कुमार (३१, ठाणे पश्चिम) यांनाही अटक करण्यात आली. हे दोघे ग्राहकांच्या नावावर सिमकार्ड काढून आर्थिक मोबदल्यात ती साथीदारांना पुरवत होते.

भूमिका

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावरील गडचिरोली जिल्ह्याची ओळख अनेक दशकांपासून नक्षलवाद, हिंसाचार, गरिबी आणि मागासलेपण अशीच राहिली. निसर्ग आणि खनिजसंपत्तीची विपुल देणगी लाभलेल्या या जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहापासून मात्र दूर राहावे लागले. सरकारी नोकरीसाठी गडचिरोलीला जाणे म्हणजे शिक्षेसारखे मानले जात होते.

गडचिरोली बदलतेय; विकासाच्या केंद्रस्थानी आदिवासी हवेत!

मात्र, गेल्या काही वर्षांत या जिल्ह्याचे चित्र बदलू लागले आहे. हिंसाचाराच्या सावटातून बाहेर पडत गडचिरोली विकासाच्या नव्या वाटेवर मार्गक्रमण करू लागला आहे. हा बदल निश्चितच स्वागतार्ह आणि महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.

आदिवासी क्रांतिकारक धरतीआबा बिरसा मुंडा यांच्या १५१व्या जयंतीनिमित्त गडचिरोलीत झालेला राष्ट्रीय जनजाती महासोहळा या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आभासी माध्यमातून संवाद साधताना गडचिरोलीच्या स्थित्यंतराचे कौतुक केले. आदिवासीबहुल भागांच्या विकासासाठी सुमारे तीन हजार कोटी रुपयांच्या २४३ योजनांची घोषणा करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारनेही जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.



माओवादी हिंसाचाराला आळा घालण्यासाठी सुरक्षादलांनी केलेले प्रयत्न, केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका तसेच स्थानिक जनतेचे सहकार्य यामुळे परिस्थितीत सकारात्मक बदल झाला. अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यामुळे विकासाचे नवे मार्ग खुले झाले आहेत. लोहखनिज आणि अन्य नैसर्गिक संपत्तीवर आधारित उद्योग गडचिरोलीकडे आकर्षित होत आहेत. लॉयड्स मेटल्ससारख्या उद्योगसमूहाने औद्योगिक विकासाबरोबरच स्थानिक तरुणांना रोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना रोजगार देणे हे सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे पाऊल आहे.

गडचिरोलीचे ग्रीन स्टील हब म्हणून विकसित होण्याचे स्वप्न आकार घेत आहे. रस्ते, रेल्वे आणि अन्य पायाभूत सुविधांच्या उभारणीमुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी मिळाल्यास स्थलांतराचे प्रमाण कमी होईल. आदिवासी तरुणींना आंतरराष्ट्रीय स्तरावर कौशल्य प्रशिक्षण देण्याची मिळालेली संधी ही बदलत्या परिस्थितीची सकारात्मक खूण आहे.

मात्र, औद्योगिक विकास म्हणजेच सर्वांगीण विकास असे समीकरण मानता येणार नाही. गडचिरोलीतील सामान्य आदिवासींच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडणे अधिक महत्त्वाचे आहे. आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा नसणे, आरोग्यसेवेचा अभाव, कुपोषण, सुरक्षित प्रसूतीची व्यवस्था नसणे आणि पिण्याच्या पाण्याची समस्या या बाबी आजही चिंताजनक आहेत. आश्रमशाळेतील मुलींचा सर्पदंशाने मृत्यू होणे किंवा गर्भवती महिलांना उपचारांसाठी झोळीतून न्यावे लागणे, हे विकासाच्या दाव्यांना प्रश्न विचारणारे वास्तव आहे.

त्यामुळे विकासाच्या नव्या पर्वात आदिवासींच्या मूलभूत गरजांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. चांगले शिक्षण, सुसज्ज रुग्णालये, बारमाही रस्ते, शुद्ध पाणी आणि रोजगार या सुविधा प्रत्येक दुर्गम गावापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्याचवेळी आदिवासींची संस्कृती, परंपरा, जल-जंगल-जमिनीवरील हक्क आणि नैसर्गिक वारसा जपला गेला पाहिजे. औद्योगिकीकरणाच्या नावाखाली त्यांचे विस्थापन आणि शोषण होणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागेल. नक्षलवादाच्या सावटातून बाहेर पडलेला गडचिरोली आता विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. हा सूर्योदय केवळ उद्योगांचा आणि आकडेवारीचा न राहता तेथील शेवटच्या आदिवासी कुटुंबाच्या आयुष्यातही समृद्धीचा प्रकाश घेऊन येईल, तेव्हाच या परिवर्तनाला खऱ्या अर्थाने यश मिळेल.

प्रासंगिक »

खरा खजिना

एका गावात एक गरीब शेतकरी राहत होता. त्याच्या शेतात अनेक वर्षांपासून चांगले पीक येत नव्हते. त्यामुळे तो सतत निराश असायचा. एके दिवशी त्याने आपल्या मुलांना बोलावून सांगितले.

"आपल्या शेतात कुठेतरी खजिना पुरलेला आहे. तो शोधण्यासाठी संपूर्ण शेत खणून काढा."

वडिलांच्या निधनानंतर मुलांनी खजिन्याच्या आशेने संपूर्ण शेत नांगरले. मात्र, त्यांना कुठेही सोने-चांदी मिळाले नाही.

निराश झालेल्या मुलांनी शेवटी त्या शेतात बियाणे पेरले. काही दिवसांनी पाऊस पडला आणि शेतात हिरवेगार पीक डोलू लागले.

त्या वर्षी त्यांना भरपूर उत्पन्न मिळाले.तेव्हा मोठ्या मुलाला वडिलांच्या शब्दांचा अर्थ समजला. खरा खजिना जमिनीत लपलेला नव्हता, तर मेहनतीतून मिळणाऱ्या फळात होता.

- तात्पर्य : कष्ट आणि सातत्य हीच खरी संपत्ती आहे. मेहनतीला पर्याय नसतो.

देशात असंघटित आणि गिग-प्लॅटफॉर्म कामगारांच्या सामाजिक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्रालयाने सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अंतर्गत राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळांची स्थापना केली आहे.

गिग कामगारांना सुरक्षा; ऊसतोड मजुरांचे काय?



तेलंगणा सरकारनेही गिग कामगारांसाठी स्वतंत्र कायदा केला आहे. या निर्णयांचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, डिजिटल अर्थव्यवस्थेतील कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देताना पारंपरिक असंघटित क्षेत्रातील लाखो कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. विशेषतः ऊसतोड मजुरांच्या सामाजिक सुरक्षेचा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

देशाच्या श्रमबाजारात असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठी आहे. बांधकाम कामगार, शेतमजूर, ऊसतोड कामगार, घरकाम करणारे, फेरीवाले आणि स्थलांतरित मजूर यांना आजही आरोग्य, विमा, निवृत्तीवेतन आणि आर्थिक संरक्षणाच्या पुरेशा सुविधा मिळत नाहीत. ऊसतोड मजुरांचे जीवन तर अधिकच संघर्षमय आहे. हंगामी रोजगार, स्थलांतर, अनिश्चित मजुरी, आरोग्याच्या समस्या आणि मुलांच्या शिक्षणातील अडथळे अशा अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. मात्र, त्यांच्या प्रश्नांना धोरणात्मक चर्चेत अपेक्षित स्थान मिळताना दिसत नाही.

गिग कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची चौकट निर्माण होणे ही काळाची गरज आहे. परंतु त्याचवेळी पारंपरिक असंघटित कामगारांनाही समान महत्त्व मिळाले पाहिजे. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर केल्यानंतर रेशन, आरोग्य विमा आणि अन्य सरकारी योजनांचे लाभ मिळवताना कामगारांना अडचणी येतात. रोजगाराचे ठिकाण बदलले तरी कल्याणकारी योजनांचे लाभ अखंडित मिळतील, अशी व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे.

केवळ मंडळांची स्थापना करून सामाजिक सुरक्षेचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. त्यासाठी पुरेसा निधी, प्रभावी अंमलबजावणी, कामगारांची नोंदणी आणि योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची यंत्रणा आवश्यक आहे. प्रत्येक कामगार घटकाच्या गरजा वेगळ्या असल्याने योजनांची आखणीही त्यानुसार झाली पाहिजे.

महाराष्ट्रात ऊसतोड मजुरांसह असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठी आहे. राज्यस्तरीय सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्याच्या घोषणा झाल्या; मात्र त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आता केवळ घोषणांपुरते न थांबता ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. डिजिटल युगातील गिग कामगारांना सुरक्षा देताना शेतात राबणाऱ्या, ऊसाच्या फडात घाम गाळणाऱ्या मजुरांनाही विसरून चालणार नाही. सामाजिक सुरक्षा ही निवडक कामगारांची मक्तेदारी नसून प्रत्येक श्रमिकाचा अधिकार आहे.

।। अभंगवाणी ।।



झेला रे झेला वरचेवर झेला ।
हातिचें गमावी तो पाठीं साहे टोला ॥१॥

त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा ।
वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

विदर्भात दर आठ तासांनी शेतकऱ्याची आत्महत्या!

दीड महिन्यात १५५ जणांनी संपवले जीवन; कर्जमाफी आणि पॅकेजचा दिलासा अपुरा

महाईन्यूज । अमरावती

नापिकी, वाढते कर्ज, शेतमालाला मिळणारा कमी भाव आणि नैसर्गिक आपत्तींच्या चक्रात अडकलेल्या विदर्भातील शेतकऱ्यांचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध पॅकेज, कर्जमाफी आणि योजनांच्या घोषणा केल्या जात असल्या, तरी आत्महत्यांचे सत्र थांबलेले नाही. गेल्या दीड महिन्यात विदर्भातील सुमारे १५५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. म्हणजेच दररोज सरासरी तीन शेतकरी जीवन संपवत आहेत.



विदर्भातील अकरा जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबर महिन्यात १२७, तर नोव्हेंबरच्या पहिल्या १६ दिवसांत २८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती विभागात आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या विभागात सप्टेंबरमध्ये ८५, तर ऑक्टोबरमध्ये ९६ शेतकऱ्यांनी जीवन संपवले. दर आठ तासांनी एका शेतकऱ्याची आत्महत्या होत असल्याचे या आकडेवारीतून स्पष्ट होते.

पश्चिम विदर्भातील ७० टक्क्यांपेक्षा अधिक शेती कोरडवाहू असून, सिंचनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे येथील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. कर्ज काढून पेरणी करायची, पीक वाचविण्यासाठी मेहनत घ्यायची आणि ऐन हंगामात अतिवृष्टी, दुष्काळ किंवा अन्य नैसर्गिक संकटांचा सामना करायचा, असे शेतकऱ्यांचे दुष्टचक्र सुरू आहे. त्यातच उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने आर्थिक गणित कोलमडते. परिणामी, कर्जाची परतफेड आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह या दोन्हींचा ताण शेतकऱ्यांवर येत आहे.

शेतकरी आत्महत्यांमागे केवळ दुष्काळ किंवा नापिकी हीच कारणे नाहीत. शेतमालाचे घसरलेले भाव, पीकविमा योजनेतील अडचणी, पीककर्ज मिळविताना होणारी अडवणूक, वीज आणि पाणीटंचाई, तसेच सरकारी योजनांचा लाभ मिळविण्यात येणाऱ्या अडचणी यांचाही शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होत आहे. पीकविम्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याच्या आणि बँकांकडून पीककर्जासाठी सहकार्य होत नसल्याच्या तक्रारी आहेत. कर्जमाफीच्या घोषणा होऊनही शेतकऱ्यांच्या अडचणी कायम असल्याचे चित्र आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने यापूर्वी अनेक आर्थिक पॅकेज आणि कर्जमाफीच्या योजना जाहीर केल्या. २००५ मध्ये राज्य शासनाने १ हजार ७५ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. २००६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी ३ हजार ७५० कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले. २००८ मध्ये केंद्र सरकारने ६० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली. त्यानंतर २०१७ मध्ये तत्कालीन फडणवीस सरकारने ३४ हजार २० कोटी रुपयांची कर्जमाफी घोषित केली. २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकारनेही कर्जमाफीची योजना राबवली. महायुती सरकारने राज्य शेतकरी आत्महत्यामुक्त करण्याची ग्वाही दिली होती. मात्र, विविध योजनांनंतरही आत्महत्यांचे सत्र कायम आहे. त्यामुळे केवळ घोषणांऐवजी शेतकऱ्यांना वेळेवर पीककर्ज, पीकविम्याची मदत, सिंचन सुविधा आणि शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रभावी उपाययोजनांची गरज आहे.

कर्जमाफीचा दिलासा अपुरा

पीककर्ज मिळविताना येणाऱ्या अडचणी, पीकविम्याचा लाभ मिळण्यात होणारा विलंब, वीज-पाणीटंचाई आणि सरकारी योजनांचा लाभ मिळविताना होणारी अडवणूक यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी कायम आहे. त्यामुळे केवळ कर्जमाफी नव्हे, तर कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज आहे.

पक्ष बाळासाहेबांच्या नावाने, आंदोलनात त्यांचाच फोटो फाडला!

महाईन्यूज । मुंबई

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या 'बिलॉगिंग-अ जर्नी ऑफ लव्ह' या पुस्तकातून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा अपमान झाल्याचा आरोप करत शिवसेना (शिंदे गट) पक्षाने निषेध आंदोलन केले. मात्र, या आंदोलनादरम्यान पक्षाच्या प्रवक्त्या शायना एनसी यांच्याकडून अनवधानाने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचाच फोटो फाडला गेला. ही घटना कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी या प्रकारावरून शिंदे गटाला धारेवर धरले.



शिंदे गटाच्या सहा प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेऊन सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील एका लेखाचा निषेध नोंदवला. या लेखातून सावरकरांचा अपमान झाल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी उद्धव ठाकरे हे पुस्तकाची प्रत स्वीकारत असल्याचा फोटो आणि बाळासाहेब ठाकरे यांनी २००४ मध्ये मणिशंकर अय्यर यांच्या पुतळ्याला जोडे मारल्याचा फोटो पत्रकारांना दाखवण्यात आला. सावरकरांच्या मुद्द्यावर उद्धव ठाकरे यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही करण्यात आली.

या निषेधादरम्यान उद्धव ठाकरे यांचा फोटो आणि पुस्तकाच्या प्रती फाडण्यात आल्या. मात्र, फोटो फाडताना शायना एनसी यांच्या हातून चुकून बाळासाहेब ठाकरे यांचाही फोटो फाडला गेला. हा प्रकार लक्षात येताच संजय निरुपम यांनी त्यांची चूक निदर्शनास आणून दिली. त्यानंतर शायना एनसी यांनी माफी मागत फोटो बाजूला ठेवला. मात्र, हा प्रकार कॅमेऱ्यात कैद झाल्याने विरोधकांनी शिंदे गटावर टीका सुरू केली.

ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी या घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. बाळासाहेब ठाकरे हे सर्वांचे दैवत असल्याचे सांगत त्यांनी शिंदे गटाला सवाल केला. बाळासाहेबांच्या नावावर पक्ष चालवायचा आणि त्यांचाच फोटो फाडला गेल्यानंतर संबंधितांवर कोणतीही कारवाई करायची नाही, हे योग्य आहे का? बाळासाहेबांचे नाव केवळ पक्ष चालवण्यासाठीच वापरणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सोनिया गांधी यांच्या पुस्तकातून सावरकरांचा अपमान झाल्याचा मुद्दा शिंदे गटाला महत्त्वाचा वाटत असेल, तर बाळासाहेबांचा फोटो फाडला गेल्याचा प्रकार त्यांना का खटकत नाही, असा सवालही पेडणेकर यांनी केला. दरम्यान, शायना एनसी यांनी या प्रकाराबाबत स्पष्टीकरण देताना बाळासाहेब ठाकरे हे आमचे दैवत असून त्यांच्या विचारांवरच आम्ही पुढे जात आहोत, असे सांगितले.

'बाळासाहेब आमचे दैवत'

फोटो फाडण्याच्या प्रकारावर स्पष्टीकरण देताना शायना एनसी यांनी बाळासाहेब ठाकरे हे आमचे दैवत असून त्यांच्या विचारांवरच आम्ही पुढे जात आहोत, असे सांगितले. सावरकरांविरोधातील कथित अपमानजनक वक्तव्याचा निषेध करण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली होती. अनवधानाने झालेल्या चुकीबद्दल त्यांनी माफीही मागितली. मात्र, या घटनेमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

बाळासाहेबांच्या फोटोवरून वाद

सावरकरांच्या कथित अपमानाचा निषेध करण्यासाठी शिंदे गटाने पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी फोटो फाडताना शायना एनसी यांच्या हातून चुकून बाळासाहेब ठाकरे यांचाही फोटो फाडला गेला. ही बाब लक्षात येताच संजय निरुपम यांनी त्यांची चूक निदर्शनास आणून दिली. त्यानंतर शायना एनसी यांनी माफी मागितली. मात्र, या घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर विरोधकांनी शिंदे गटावर टीका सुरू केली. सावरकरांविरोधातील कथित अपमानजनक वक्तव्याचा निषेध करण्यासाठीच पत्रकार परिषद घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मणिशंकर अय्यर यांचा फोटो हजार वेळा फाडू, असेही त्या म्हणाल्या.

ट्रम्प-बायडेन यांच्या हत्येचा कट?

इराणच्या इशाऱ्यावरून कट रचणाऱ्या पाकिस्तानी नागरिकाला अमेरिकेत सत्तावीस वर्षे तुरुंगवास

महाईन्यूज । नवी दिल्ली

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इतर बड्या राजकीय नेत्यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी अमेरिकेतील न्यायालयानं एका पाकिस्तानी नागरिकाला २७ वर्षे आणि ६ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. आसिफ मर्चंट (वय ४८) असं या गुन्हेगाराचं नाव असून, त्याने इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' या लष्करी संघटनेच्या इशाऱ्यावरून हा कट रचल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे. 'द इंडियन एक्सप्रेस'ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे.







ब्रुकलिन न्यायालयाचे न्यायाधीश एरिक आर. कोमिटी यांनी मंगळवारी (१७ नोव्हेंबर) ही शिक्षा सुनावली. आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादी कृत्य करण्याचा प्रयत्न करणं आणि सुपारी देऊन हत्या घडवून आणण्याचा कट रचणं या गंभीर गुन्ह्यांखाली मार्च २०२६ मध्ये न्यायालयानं मर्चंटला दोषी ठरवलं होतं, अशी माहिती अमेरिकेच्या न्याय विभागानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

जानेवारी २०२० मध्ये अमेरिकेने केलेल्या ड्रोन हल्ल्यात इराणचे माजी लष्करी कमांडर कासिम सुलेमानी ठार झाले होते. या हत्येचा बदला घेण्यासाठीच इराणने हा हत्येचा कट रचला असल्याचे बोलले जात आहे.

न्यायालयात सुनावणीदरम्यान मर्चंटने कबुली दिली की, तो २०२२ च्या सुमारास स्वतःहून 'आयआरजीसी'मध्ये सहभागी झाला होता. धार्मिक यात्रेनिमित्त इराणला गेला असता, एका नातेवाईकाने त्याची ओळख युसूफ मेरहरदाद नावाच्या कथित 'आयआरजीसी' हँडलरशी करून दिली होती.

२०२३ पासून पुढील १८ महिन्यांत मर्चंटने तेहरानमध्ये या हँडलरच्या सुमारे १५ वेळा भेटी घेतल्या. या बैठकांमध्ये त्याला गुप्तचर यंत्रणांना चकवा देण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, अमेरिकेत जाऊन तेथील प्रचारसभांदरम्यान स्थानिक गुंड किंवा माफियांच्या मदतीने राजकीय नेत्यांची हत्या घडवून आणण्याचे आदेश त्याला देण्यात आले होते.

या कटात ट्रम्प हेच मुख्य लक्ष्य असल्याची कल्पना आपल्याला होती, अशी कबुलीही मर्चंटने न्यायालयात दिली. एप्रिल २०२४ मध्ये इराणमध्ये एक आठवडा राहिल्यानंतर मर्चंट या कटाची अंमलबजावणी करण्यासाठी अमेरिकेत पोहोचला. तिथे त्याने मदतीसाठी एका ओळखीच्या व्यक्तीशी संपर्क साधला.

नेमका कट काय होता?

इराणच्या 'आयआरजीसी' या निमलष्करी संघटनेच्या निर्देशानुसार अमेरिकन सरकारी अधिकाऱ्यांची हत्या घडवून आणण्यासाठी मर्चंट एप्रिल २०२४ मध्ये अमेरिकेत दाखल झाला होता. या कटात डोनाल्ड ट्रम्प हे मुख्य लक्ष्य होते. मात्र, तपास अधिकाऱ्यांना दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि संयुक्त राष्ट्रांतील अमेरिकेच्या माजी राजदूत निकी हेली यांचीही नावे संभाव्य लक्ष्यांच्या यादीत होती. विशेष म्हणजे, त्यावेळी हे तिन्ही नेते अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत होते.

सोनिया गांधींच्या 'बिलाँगिंग' आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्याचे डाव्या नेत्यांना निमंत्रणच नाही

महाईन्यूज । गुजरात

सोनिया गांधी यांचे बहुचर्चित आत्मचरित्र 'बिलाँगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' प्रकाशित झाले आहे. या सोहळ्याला पाच राज्यांचे मुख्यमंत्री आणि इंडिया आघाडीतील अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. मात्र, या कार्यक्रमाला डाव्या पक्षांच्या नेत्यांना निमंत्रणच देण्यात आले नसल्याची माहिती समोर आली आहे. खुद्द तीन प्रमुख डाव्या नेत्यांनी या वृत्ताला दुजोरा दिला असून, यामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. 'हिंदूस्तान टाइम्स' ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे.



राहुल गांधींसोबत चांगले राजकीय संबंध असलेले 'भाकपा (माले) लिबरेशन'चे नेते दीपंकर भट्टाचार्य यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. निमंत्रण नसल्यामुळेच आपण या सोहळ्याला उपस्थित राहू शकलो नसल्याचे त्यांनी सांगितले. "मी इतर काही डाव्या नेत्यांकडेही चौकशी केली, मात्र त्यांनाही या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळालेले नव्हते," असे भट्टाचार्य यांनी नमूद केले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, त्यांच्या पक्षालाही या प्रकाशन सोहळ्याचे कोणतेही निमंत्रण आले नव्हते. फॉरवर्ड ब्लॉकचे नेते जी. देवराजन यांनीही याला दुजोरा दिला आहे. त्यांनी इतर सहकाऱ्यांकडे विचारपूस केली असता, काँग्रेसकडून किंवा आयोजकांकडून कोणतेही निमंत्रण दिले गेले नसल्याचे स्पष्ट झाले.

'इंडिया' आघाडीतील इतर घटक पक्षांची या सोहळ्याला मोठी मांदियाळी असताना डाव्यांना डावलण्यात आल्याने काही नेत्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाला तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यासह नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूख अब्दुल्ला उपस्थित होते. तसेच समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, खासदार डिंपल यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनीही या सोहळ्याला हजेरी लावली होती.

विशेष म्हणजे, २०२१ मध्ये काँग्रेसला रामराम ठोकून भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेले पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग हेदेखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामुळे डाव्या पक्षांच्या अनुपस्थितीची चर्चा अधिकच रंगली आहे.

दरम्यान, या वादावर काँग्रेसच्या एका नेत्याने सावध प्रतिक्रिया दिली आहे. "हा 'इंडिया' आघाडीचा अधिकृत कार्यक्रम नव्हता, त्यामुळे विरोधी पक्षातील काही निवडक नेत्यांनाच निमंत्रित करण्यात आले होते," असा दावा त्यांनी केला. दुसरीकडे, आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसने अखिलेश यादव यांना विशेष निमंत्रण दिले असावे, असा अंदाज एका डाव्या नेत्याने व्यक्त केला आहे.

डाव्या पक्षांच्या नेत्यांना निमंत्रणच नाही!

सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्यात इंडिया आघाडीतील अनेक प्रमुख नेत्यांची उपस्थिती असताना डाव्या पक्षांना निमंत्रण न मिळाल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. भाकपा (माले), माकप आणि फॉरवर्ड ब्लॉकच्या नेत्यांनी निमंत्रण मिळाले नसल्याचे स्पष्ट केले आहे. हा इंडिया आघाडीचा अधिकृत कार्यक्रम नसल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात येत आहे. आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अखिलेश यादव यांना विशेष निमंत्रण दिल्याची चर्चा आहे. मात्र, आघाडीतील डाव्या पक्षांना डावलण्यामागचे नेमके कारण काय, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. यामुळे काँग्रेस आणि डाव्या पक्षांमधील राजकीय समीकरणांवर नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



कैकेयी नसती तर रामायण घडलंच नसतं

बॉलिवूड अभिनेत्री शर्वरी वाघ आपल्या अभिनयासोबतच हटके फॅशन आणि स्टायलिश लूकमुळेही नेहमी चर्चेत असते. वेस्टर्न असो किंवा पारंपरिक, प्रत्येक लूकमध्ये ती चाहत्यांचे लक्ष वेधून घेते. सध्या शर्वरी तिच्या आगामी 'ये प्रेम मोल लिया' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी तिने परिधान केलेल्या सुंदर पारंपरिक लूकने सोशल मीडियावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोनेरी आणि पीच रंगाच्या शरारा सूटमध्ये शर्वरीचा शाही अंदाज पाहायला मिळत आहे. शर्वरीने तिच्या प्रमोशनल लूकसाठी सोनेरी आणि पीच रंगाची सुंदर रंगसंगती असलेला शरारा सूट निवडला आहे. या सूटवर आकर्षक एम्ब्रॉयडरी करण्यात आली असून, त्याला हॉल्टर-नेक डिझाइन देण्यात आले आहे. या डिझाइनमुळे तिच्या पारंपरिक लूकला आधुनिक टच मिळाला आहे. साधेपणा आणि आकर्षकपणा यांचा सुंदर मेळ तिच्या या पोशाखात पाहायला मिळतो. या शरारा सूटची खासियत म्हणजे त्यावरील नाजूक भरतकाम. सोनेरी रंगाची चमक आणि पीच रंगाची सुंदर छटा यामुळे संपूर्ण पोशाख अधिक आकर्षक दिसत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी पारंपरिक लूक निवडताना शर्वरीने फॅशन आणि भारतीय संस्कृती यांचा उत्तम



अर्शद वारसीचा ओटीटीवर पुन्हा धमाका!

विनोदी भूमिका असो किंवा गंभीर व्यक्तिरेखा, प्रत्येक भूमिकेतून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारा अभिनेता म्हणजे अर्शद वारसी. या अभिनेत्याने ओटीटी विश्वातही आपली वेगळी छाप पाडली आहे. आता त्याच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. अर्शद लवकरच आपल्या पाचव्या वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अर्शद वारसीच्या आगामी वेब सीरिजचे नाव 'व्हिक्टिम्स' असे आहे. ही एक सस्पेन्स-थ्रिलर सीरिज असणार असून, यामध्ये अर्शद मुख्य भूमिकेत दिसणार आहे. त्याच्यासोबत अभिनेता करण टॅकर आणि अभिनेत्री रसिका दुग्गल यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहेत. या सीरिजची निर्मिती फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांच्या एक्सेल एंटरटेनमेंट या निर्मिती संस्थेअंतर्गत केली जात आहे. तर सिरीजचे दिग्दर्शन मिहिर देसाई करणार आहेत. या सिरीजच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली असून, सध्या अर्शद वारसीसह संपूर्ण टीम यूकेमध्ये शूटिंग करत आहे. दरम्यान, अर्शद वारसीच्या आगामी चित्रपटाबाबतही महत्त्वाची माहिती समोर आली आहे. शाहरुख खानच्या बहुप्रतीक्षित 'किंग' या चित्रपटात अर्शद पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसणार असल्याचे वृत्त आहे. याशिवाय अर्शद वारसीची लोकप्रिय 'असुर' या वेबसीरिजच्या तिसऱ्या सीझनचीही निर्मात्यांनी घोषणा केली आहे. त्यामुळे अर्शदच्या चाहत्यांसाठी आगामी काळ मनोरंजनाने भरलेला असणार आहे.



'पंचायत सीझन 5'ची रिलीज डेट जाहीर

अखेर 'पंचायत' सीझन ५' याचवर्षी प्रेक्षकांना पाहता येणार आहे. काहीच दिवसांपूर्वी मेकर्सने पंचायत 5 साठी प्रतिक्षा करावी लागणार असल्याचे सांगितल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता याची अधिकृतरित्या रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. पुढील महिन्यात ३ डिसेंबर रोजी प्राईम व्हिडीओ या ओटीटीवर 'पंचायत ५' रिलीज होणार आहे. अमेझॉन प्राइमवर हा सीझन पाहता येणार आहे. 'पंचायत'च्या नव्या सीझनमध्ये गावातील राजकारण, संघर्ष पाहायला मिळणार आहे. फुलेराला आता नवे मुखिया मिळाले आहेत, त्यामुळेच नवे प्रधानपती बनलेल्या बनराकसने सचिवजींना त्रास देण्यासाठी नेमका काय प्लॅन केला, याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. यात सत्तेतील बदलासोबतच फुलेरामध्ये नवीन प्रतिस्पर्धी आणि बदलती समीकरणे देखील पाहायला मिळतील. याशिवाय 'पंचायत ५' मध्ये सचिवजी आणि रिंकीची प्रेमकहाणी पुढे सरकताना दिसणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा फुलेरा गावची रंजक कहाणी पाहता येणार आहे. दीपक कुमार मिश्रा पुन्हा एकदा या नवीन सीझनच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळत आहेत. दीपक कुमार मिश्रा, चंदन कुमार आणि अरुणाभ कुमार यांनी या सीरिजची निर्मिती केली आहे. या सीझनमध्ये जितेंद्र कुमार, रघुबीर यादव, नीना गुप्ता, सुनीता राजवर, फैसल मलिक, चंदन रॉय, संविका, दुर्गेश कुमार आणि अशोक पाठक हे प्रमुख कलाकार पुन्हा एकदा आपल्या लोकप्रिय भूमिकांमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

सिनेवेड्या चेन्नईकरांचा क्रिकेटपटू 'थाला'!

धोनीची खेळाडू म्हणून निवृत्ती हा केवळ एका क्रिकेट कारकिर्दीचा शेवट नाही

महाईन्यूज । मुंबई

चेन्नई सुपर किंग्ज आणि महेंद्रसिंह धोनी... गेली जवळपास दोन दशके हे एक समीकरणच बनले होते. अगदी या संघाच्या मालकांच्या शब्दांत सांगायचे तर, 'धोनीविना चेन्नईचा विचारही अवघड'! हे नाते अतूट असले, तरी चेन्नईकरांचा लाडका 'थाला' आता इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) खेळाडू म्हणून दिसणार नाही. मात्र, यामुळे चेन्नईकरांचे धोनीप्रेम तिळमात्रही कमी होणार नाही, हे निश्चित. खेळाडू म्हणून निवृत्ती घेतल्यानंतरही तो 'मेंटॉर' म्हणून या संघाचा भाग राहणार आहे.



एका परक्या शहराला आपले मानण्यास भाग पाडणाऱ्या धोनीची कहाणी केवळ क्रिकेटपुरती मर्यादित नाही. चेन्नईने त्याला खेळाडू व कर्णधार म्हणून स्वीकारले आणि पुढे आपल्या संस्कृतीचाच भाग बनवले.

चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम (चेपॉक) स्टेडियमवर धोनी सीमारेषा ओलांडून मैदानात उतरायचा आणि क्षणार्धात वातावरण बदलायचे. पिवळ्या जर्सीतील हजारो प्रेक्षक उभे राहायचे. मग शिट्ट्यांचा आवाज. मैदानावरील मोठ्या पडद्यावर एक चेहरा झळकायचा आणि संपूर्ण स्टेडियममध्ये 'धोनी...धोनी'चा गजर व्हायचा. ती चाल, तो आत्मविश्वास आणि चेहऱ्यावरचे निर्विकार भाव. धोनीचा मैदानातील प्रवेश हा चेन्नईकरांसाठी जणू वेगळा सोहळा असायचा.

चेन्नईसारख्या शहरात, जिथे सुपरस्टार जन्माला येतात ते प्रामुख्याने चित्रपटसृष्टीतून किंवा राजकारणातून, तिथे हजारो किलोमीटर दूर असलेल्या रांचीमधून आलेल्या एका क्रिकेटपटूने स्वतःचे असे साम्राज्य उभे केले, की त्याची लोकप्रियता चित्रपटातील महानायकांशी स्पर्धा करू लागली. धोनीची खेळाडू म्हणून निवृत्ती हा केवळ एका क्रिकेट कारकिर्दीचा शेवट नाही, तर 'आयपीएल'च्या इतिहासातील एका विलक्षण पर्वावर पडलेला पडदा आहे.

धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नईने पहिल्याच हंगामात अंतिम फेरी गाठली. मग २०१० आणि २०११ मध्ये सलग दोन विजेतेपदे मिळवली. त्यानंतर २०१८ मध्ये दोन वर्षांच्या बंदीनंतर पुनरागमन करताच पुन्हा विजेतेपद पटकावले. २०२१ आणि २०२३ मध्येही चेन्नईने जेतेपद मिळवले. मात्र, या यशापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे धोनीने शहरातील चाहत्यांचा विश्वास जिंकला.

तमिळ भाषेत 'थाला' म्हणजे प्रमुख, नेता किंवा मोठा भाऊ. सुरुवातीला चाहत्यांनी धोनीला दिलेली ही हाक कालांतराने चेन्नई सुपर किंग्जच्या अस्मितेचा भाग बनली. रजनीकांत यांना जसे 'थलैवर' म्हणून संबोधले जाते, तसेच धोनीसाठी 'थाला' ही उपाधी एका वेगळ्याच लोकप्रियतेचे प्रतीक ठरली.

चेन्नईच्या सामन्यांमध्ये पिवळ्या जर्सींचा समुद्र दिसायचा. त्यातील असंख्य जर्सींवर सात हा क्रमांक आणि धोनी हे नाव असायचे. त्याच्या मैदानातील प्रत्येक हालचालीला प्रेक्षकांची दाद मिळायची. तो फलंदाजीला आला की सामना जिंकण्याची शक्यता किती आहे, यापेक्षा त्याला खेळताना पाहण्याची संधी मिळते आहे, याचाच चाहत्यांना अधिक आनंद असायचा.

चेन्नईचा नसलेला चेन्नईकर

धोनीचा जन्म रांचीचा. चेन्नईशी त्याचे कोणतेही भाषिक, सांस्कृतिक किंवा कौटुंबिक नाते नव्हते. तमिळ भाषाही त्याला अवगत नव्हती. तरीही तो चेन्नई शहराच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला. या नात्याची सुरुवात झाली २००८ मध्ये, 'आयपीएल'च्या पहिल्या लिलावातून. मुंबईकडे सचिन तेंडुलकर, कोलकाताकडे सौरव गांगुली, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुकडे राहुल द्रविड आणि दिल्लीकडे वीरेंद्र सेहवाग असे मोठे चेहरे असताना चेन्नईने वेगळा निर्णय घेतला. २००७च्या ट्वेन्टी-२० विश्वचषकात भारताला विजेतेपद मिळवून देणाऱ्या धोनीसाठी त्यांनी तब्बल १५ लाख अमेरिकन डॉलर मोजले. त्या लिलावातील तो सर्वाधिक किंमत मिळवणारा खेळाडू ठरला.

शुभमन गिलच्या नेतृत्वातील टीम इंडियाला एक चूक पडू शकते महागात

महाईन्यूज । नवी दिल्ली

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात १९ नोव्हेंबर पासून दोन कसोटी सामन्यांची मालिका सुरू होत आहे. यापूर्वी दौऱ्यात भारताने टी २० आणि वनडे मालिकेत विजय मिळवला आहे. त्यामुळं या मालिकेत न्यूझीलंड त्वेशाने खेळले यात शंका नाही. भारतासाठी ही कसोटी मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल गाठण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे.



या मालिकेवरच भारताचे आव्हान अबाधित राहणार की संपुष्टात येणार याचा निर्णय होणार आहे. भारताचे wtc मधील अजून ७ सामने शिल्लक आहेत. सध्याच्या घडीला भारताची स्थिती पाहता भारताला एकापेक्षा जास्त पराभव परवडणारे नाहीत. एवढेच काय तर एखादा सामना अनिर्णित जरी राहिला तरी भारतासाठी डोकेदुखीच ठरणार आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक कसोटी सामना हा करो या मरो अशा पद्धतीनेच खेळावा लागणार आहे. प्रत्येक सामन्यात आपल्याला मोठी ताकद लावावी लागणार आहे.

आता wtc ची फायनल खेळण्यासाठी टीम इंडियाला मोठा जोर लावावा लागणार आहे. जर भारत आपल्या सर्व सात च्या सात सामन्यात विजय मिळतो तर आपण सहज फायलन गाठू. मात्र ओव्हर रेटमुळे जर पॉईंट्स कमी झाले तर स्थिती अवघड होण्याची शक्यता आहे.

जर भारत सहा सामने जिंकला आणि एक सामना ड्रॉ झाला तर विनिग पर्सेंटेज कमी होऊन ६६.६७ टक्के इतकं होईल. जर सहा विजय आणि एक पराभव अशी स्थिती झाली तर विनिंग पर्सेंटेज ६४.८१ टक्के होईल. या सिनोरियोमध्ये फायनलपर्यंत पोहोचण्याची संधी असेल मात्र अजून एक पराभव झाला तर काम तमाम होऊन जाईल. त्यामुळं भारतासाठी चुकीला माफी नाही अशी स्थिती आहे.

भारत WTC मध्ये कुठं?

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ सायकलमध्ये सध्या टीम इंडियाने ११ कसोटी सामने खेळले आहेत. त्यातील ५ जिंकले असून ४ सामन्यात पराभव सहन करावा लागला आहे. तर २ सामने हे अनिर्णित राहिले आहेत. भारताचे विनिंग पर्सेंटेज हे ५१.३२ असून गुण तालिकेत भारत सध्या चौथ्या स्थानावर आहे. भारताचे आजून ७ कसोटी सामने शिल्लक आहेत. यातील दोन कसोटी सामने न्यूझीलंडविरूद्ध खेळायचे आहेत. तर ५ कसोटी सामन्यांची मालिका ऑस्ट्रेलियाविरूद्ध होणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। गुरुवार ।
दि. 19 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

RAJMATA JIJAU SHIKSHAN PRASARAK MANDAL's
Group of Institutes

Proud Contributor & Supporter of

ROTARY ROTARACT

YOUTH FESTIVAL

Rotary District 3131

Naya Bharat Amritkaal 2047

Rotaract District 3131

21 & 22 NOVEMBER 2026 Fergusson college Ground, PUNE

ADMISSIONS OPEN

Computer Science, AIML, Data Science, Cyber Security, Biotechnology, Commerce and Management, Pharmacy, Nursing, MBA & MCA, CBSE school

Landewadi, Bhosari, Pune 411039 +91 8767562637

Scan To Register

Guest of Honour



Shri. Devendra Fadnavis
Chief Minister of Maharashtra



Shri. Murlidhar Mohol
Member of Parliament (MP) & Union Minister of State Ministry of Civil Aviation & Cooperation

HON. MR. VILAS LANDE
Ex. MLA and President

HON. MR. SUDHIR MUNGASE
Secretary

HON. MR. AJIT GAVHANE
Treasurer

HON. MR. VIKRANT LANDE
Trustee

भटक्या श्वानांच्या समस्येवर उपाययोजना करा

लसीकरण, नसबंदी आणि आक्रमक श्वानांच्या व्यवस्थापनासाठी प्रभावी कार्यवाही करण्याच्या सूचना

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

शहरातील भटक्या श्वानांमुळे नागरिकांना होणारा त्रास आणि सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेता उपमहापौर शर्मिला बाबर यांनी गवळीमाथा रोड, पिंपरी येथील श्वान निवारा केंद्र आणि पशु इस्पितळाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी निवारा केंद्रातील व्यवस्था, श्वानांचे लसीकरण व नसबंदी, तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत भटक्या श्वानांच्या समस्येवर तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.



शहरातील विविध भागांतून भटक्या श्वानांच्या त्रासाबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी संभाव्य समस्याग्रस्त भागांची ओळख करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्याची गरज असल्याचे उपमहापौर बाबर यांनी यावेळी स्पष्ट केले.

नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची असली तरी श्वान निवारा केंद्रात आणलेल्या श्वानांची योग्य काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे, श्वानांना वेळेवर अन्न व स्वच्छ पाणी, आवश्यक औषधोपचार आणि लसीकरण मिळत आहे का, तसेच केंद्रातील स्वच्छता आणि आरोग्यविषयक सुविधा योग्य आहेत का, याची देखील त्यांनी पाहणी केली. केंद्रातील व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी डॉक्टर, औषधे, पाणी, स्वच्छता किंवा अन्य आवश्यक सुविधांची कमतरता असल्यास ती निदर्शनास आणून द्यावी, जेणेकरून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करता येईल, असेही त्यांनी सांगितले. या पाहणीप्रसंगी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांच्यासह पशुवैद्यकीय विभागाचे अधिकारी, डॉक्टर्स आणि कर्मचारी उपस्थित होते.

नसबंदी आणि आक्रमक श्वानांच्या व्यवस्थापनासाठी सूचना

पाहणीदरम्यान श्वानांची संख्या, लसीकरण व नसबंदीची सद्यस्थिती, श्वान पकडण्यासाठी उपलब्ध पथके, मनुष्यबळ आणि साधनसामग्री याबाबत त्यांनी माहिती घेतली. लसीकरण व नसबंदीच्या कामाला गती देऊन ते नियमितपणे सुरू ठेवावे, तसेच चावणाऱ्या किंवा आक्रमक श्वानांबाबत तक्रार प्राप्त झाल्यास २४ तासांच्या आत आवश्यक कार्यवाही करून त्यांना नियमानुसार सुरक्षितपणे वेगळे ठेवण्याची व्यवस्था करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. वारंवार तक्रारी येणाऱ्या भागांत प्राधान्याने कार्यवाही करावी आणि आवश्यकतेनुसार पथकांची संख्या व साधनसामग्री वाढवावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील अडचणीही त्यांनी जाणून घेतल्या. या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून त्यावर तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

नागरिकांची सुरक्षितता आणि प्राण्यांची काळजी

शहरातील नागरिकांना रस्त्यावरून निर्भयपणे वावरता आले पाहिजे. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही हलगर्जीपणा होता कामा नये. त्याचवेळी मुक्या प्राण्यांशी माणुसकीने वागत त्यांच्या आरोग्याची आणि देखभालीची योग्य व्यवस्था करणेही आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांची सुरक्षा आणि श्वानांची काळजी या दोन्ही बाबींचा समतोल राखून प्रभावी कार्यवाही करावी, असे देखील उपमहापौर बाबर यांनी सांगितले. यावेळी उपमहापौर बाबर यांनी नागरिकांना आवाहन केले की, भटक्या श्वानांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा समस्या असल्यास नागरिकांनी ८७८०७०६६५ या क्रमांकावर संपर्क साधून आपली तक्रार नोंदवावी. प्राप्त तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

दिवाळीची सुट्टी संपली; गुरुवारपासून पुन्हा माध्यमिक शाळेची घंटा वाजणार

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

दिवाळीच्या सुट्टीनंतर आज गुरुवारी, दि. १९ नोव्हेंबरपासून माध्यमिक शाळा पुन्हा सुरू होत आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शांत असलेले शाळांचे परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने पुन्हा गजबजणार आहेत. सुट्टीनंतर मित्र-मैत्रिणींना भेटण्यासोबतच शाळेतील दैनंदिन उपक्रमांना सुरुवात होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



दिवाळीच्या सुट्टीनंतर शैक्षणिक सत्रातील महत्त्वाचा टप्पा सुरू होत आहे. त्यामुळे उर्वरित अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्याचे आव्हान शिक्षकांसमोर राहणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना वाचन, लेखन, गणित किंवा अन्य विषयांमध्ये अडचणी आहेत, त्यांच्यावर विशेष लक्ष देऊन त्यांची उजळणी करून घेण्याची गरज आहे. याचबरोबर आगामी पॅट परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची तयारी करून घेणेही महत्त्वाचे ठरणार आहे. आतापर्यंत झालेल्या अध्यापनाचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी तपासली जाणार आहे.

दरम्यान, शाळा सुरू होत असताना विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांच्या लाभाची स्थितीही तपासण्याची आवश्यकता आहे. शालेय पोषण आहार, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, शिष्यवृत्ती तसेच अन्य योजनांचा लाभ प्रत्येक पात्र विद्यार्थ्यापर्यंत पोहोचला आहे का, याकडे शिक्षण विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे. दिवाळीनंतर सुरू होणाऱ्या या शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांचा उत्साह कायम ठेवत अभ्यासक्रम पूर्ण करणे, गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे आणि शाळांमधील आवश्यक सुविधा सुरळीत ठेवणे, अशी तिहेरी जबाबदारी शिक्षक व शिक्षण यंत्रणेसमोर असणार आहे.

पिंपरी-चिंचवडच्या शिरपेचात मानाचा तुरा!

ॲड. संजय दातीर पाटील यांची महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलच्या शिस्तपालन समितीच्या अध्यक्षपदी निवड

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवडच्या विधी क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरणारी निवड झाली आहे. पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. संजय भाऊसाहेब दातीर पाटील यांची बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाच्या अत्यंत महत्त्वाच्या शिस्तपालन समितीच्या (डिसिप्लिनरी कमिटी) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तब्बल ३३ वर्षांच्या प्रदीर्घ वकिली कारकिर्दीत न्यायव्यवस्था, वकील संघटनांचे सक्षमीकरण आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची ही पावती मानली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे पिंपरी-चिंचवडच्या वकील वर्गात आनंदाचे वातावरण असून, विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



ॲड. संजय दातीर पाटील यांनी सन १९९४ मध्ये महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलकडून वकिलीची सनद प्राप्त करून आपल्या विधी कारकिर्दीला सुरुवात केली. कायद्याचा सखोल अभ्यास, न्यायालयीन कामकाजातील अनुभव आणि वकील वर्गाच्या प्रश्नांबाबत असलेली संवेदनशीलता यांच्या जोरावर त्यांनी विधी क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सन १९९६-९७ मध्ये पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे उपाध्यक्ष, तर सन २००६-०७ मध्ये अध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. या काळात वकिलांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि संघटनेची ताकद वाढविण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला.

वकिली व्यवसायाबरोबरच त्यांनी विविध संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. बार कौन्सिलच्या निवडणूक समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. सन २००५ पासून ते नोटरी म्हणून कार्यरत असून, बँका आणि पतसंस्थांना कायदेशीर सल्लागार म्हणून सुमारे तीन दशकांपासून सेवा देत आहेत. पिंपरी न्यायालयातील विविध प्रकरणांमध्ये त्यांनी प्रभावीपणे न्यायालयीन कामकाज केले आहे.

सध्या ते पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट सोसायटीचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. तसेच पुणे लॉयर्स कन्झ्युमर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडचे तज्ज्ञ संचालक सदस्य म्हणूनही त्यांनी योगदान दिले आहे. विधी क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली आहे.

कोरोना महामारीच्या संकटकाळात वकील वर्गासह गरजू नागरिकांच्या मदतीसाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय ठरले. अडचणीत सापडलेल्या वकिलांना आधार देण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध उपक्रमांत सहभाग घेतला. पिंपरी-चिंचवड न्यायालयीन इमारतीच्या बांधकाम समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी न्यायालयीन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

पिंपरी-चिंचवड मधील न्यायालयीन सुविधा, वकिलांचे प्रश्न आणि संघटनात्मक विकासासाठी सातत्याने कार्यरत राहिलेल्या ॲड. संजय दातीर पाटील यांना राज्यस्तरीय महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याने स्थानिक विधी क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या नियुक्तीचे वकील संघटना, सामाजिक संस्था, सहकारी क्षेत्रातील मान्यवर आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांकडून स्वागत होत आहे. वकिली व्यवसायातील प्रदीर्घ अनुभव, संघटनात्मक नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावर ॲड. संजय दातीर पाटील यांनी मिळवलेले हे यश पिंपरी-चिंचवडच्या विधी क्षेत्रासाठी गौरवास्पद ठरले आहे.

जबाबदारीत मोठी वाढ

बार कौन्सिलची शिस्तपालन समिती ही वकिली व्यवसायातील व्यावसायिक आचारसंहिता आणि शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. वकिलांविरोधातील व्यावसायिक गैरवर्तनाच्या तक्रारींची कायदेशीर चौकटीत सुनावणी करून योग्य निर्णय घेण्याची जबाबदारी या समितीवर असते. त्यामुळे या समितीच्या अध्यक्षपदासाठी कायद्याचे सखोल ज्ञान, प्रदीर्घ अनुभव, निष्पक्ष दृष्टिकोन आणि न्यायव्यवस्थेप्रती निष्ठा या बाबींना विशेष महत्त्व असते. ॲड. दातीर पाटील यांच्या नियुक्तीमुळे त्यांच्या अनुभवाचा आणि संघटनात्मक नेतृत्वाचा या महत्त्वाच्या जबाबदारीत उपयोग होणार आहे.

अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईला गती देण्याचे सांडभोर यांचे निर्देश

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृह येथे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस बांधकाम परवानगी विभागाचे सहशहर अभियंता सुनील बागवानी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक उपस्थित होते.



क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्याची नियमित कारवाई सुरू ठेवावी, असे निर्देश क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षकांना देण्यात आले. तसेच रस्त्यांवर झालेली अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांच्या ठिकाणी सुरू असलेली प्राथमिक स्वरूपातील कामे, विशेषतः फुटिंगची कामे, यांची तातडीने पाहणी करून संबंधित ठिकाणांची यादी तयार करावी आणि नियमानुसार निष्कासनाची कारवाई प्रस्तावित करावी, अशा सूचनाही देण्यात आल्या.

दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत शहरात अनधिकृत बांधकामे झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश देण्यात आले.

शहरातील इमारतींच्या पार्किंगसाठी राखीव असलेल्या जागेचा व्यावसायिक कारणांसाठी होणाऱ्या अनधिकृत वापराबाबतही बैठकीत कारवाईचा आढावा घेण्यात आला. बांधकाम परवानगी विभागाचे कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून या प्रकरणांमध्ये आवश्यक कारवाई या आठवड्यात पूर्ण करावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले.



संविधान दिनानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच भव्य 'संविधान सन्मान दौड'!

डॉ. सुहास कांबळे यांच्या पुढाकाराला यश

स्थायी समितीची मंजुरी; सभापती अभिषेक बारणे यांची माहिती



महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

भारतीय संविधानाचा सन्मान, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि युवा पिढीमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड शहरात पहिल्यांदाच आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य 'संविधान सन्मान दौड-२०२६'ला महापालिकेच्या स्थायी समितीने सर्वानुमते मंजुरी दिली आहे. या दौडीच्या आयोजनासाठी १५ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली असून, संविधान दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी एकूण ३९ लाख रुपयांची आर्थिक तरतूद मंजूर करण्यात आली आहे. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून शहरात पहिल्यांदाच भव्य 'संविधान सन्मान दौड' आयोजित करण्याची संकल्पना महापालिकेच्या शहर सुधारणा समितीचे सदस्य तथा नगरसेवक डॉ. सुहास लक्ष्मण कांबळे यांनी मांडली होती. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी या उपक्रमासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, महापौर रवि लांडगे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे या उपक्रमाचे आयोजन करण्याची मागणी करण्यात आली होती.

या मागणीची दखल घेत नुकत्याच झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय मांडण्यात आला. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या उपस्थितीत या प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. त्यामुळे संविधान सन्मान दौडीच्या आयोजनाचा मार्ग मोकळा झाला आहे. यापुढे दरवर्षी ही भव्य संविधान सन्मान दौड आयोजित केली जाईल, असा संकल्प यावेळी करण्यात आला.

> "भारतीय संविधान हे आपल्या लोकशाहीचे सर्वोच्च अधिष्ठान असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजेत. संविधान दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता जनजागृतीचा व्यापक उत्सव झाला पाहिजे. याच उद्देशाने पिंपरी-चिंचवड शहरात 'संविधान सन्मान दौड' आयोजित करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. या उपक्रमातून हजारो नागरिकांना एकत्र आणून संविधान सन्मानाची लोकचळवळ उभी करण्याचा आमचा संकल्प आहे."
> - **डॉ. सुहास लक्ष्मण कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महापालिका**

संविधान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन!

पिंपरी-चिंचवड

२६ नोव्हेंबर हा दिवस देशभरात भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये, लोकशाही व्यवस्था तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. स्थायी समितीने दिलेल्या ३९ लाख रुपयांच्या मंजुरीमुळे या उपक्रमांना आर्थिक पाठबळ मिळाले असून, शहरात संविधान दिन व्यापक लोकसहभागातून साजरा करण्याच्या दृष्टीने महापालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.



दहा किलोमीटरची भव्य दौड!

प्रस्तावित 'संविधान सन्मान दौड-२०२६' साधारण दहा किलोमीटर अंतराची असणार आहे. या उपक्रमात शहरातील शाळा, महाविद्यालये, विविध सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचत गट, क्रीडा संघटना आणि सर्वसामान्य नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग अपेक्षित आहे. हजारो नागरिकांना या दौडमध्ये सहभागी करून घेण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. ही दौड केवळ क्रीडा स्पर्धा न राहता भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये जनमानसात रुजवणारी लोकचळवळ ठरावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.



> स्थायी समितीच्या मंजुरीनंतर पत्रकार परिषदेत माहिती देताना अभिषेक बारणे यांनी संविधान दिनानिमित्त शहरात व्यापक स्वरूपात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ३९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले. त्यामध्ये संविधान सन्मान दौडीसाठी स्वतंत्रपणे १५ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. शहरातील नागरिक, विद्यार्थी आणि युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग घेऊन संविधान दिन उत्साहात आणि जनजागृतीच्या माध्यमातून साजरा करण्याचा महापालिकेचा प्रयत्न राहणार आहे.
> - **अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती**

डॉ. सुहास कांबळे यांच्या संकल्पनेला यश!

संविधान सन्मान दौडीची संकल्पना मांडून तिच्या आयोजनासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या पुढाकाराला स्थायी समितीच्या मंजुरीमुळे यश आले आहे. लोकशाही मूल्यांचा जागर, संविधानाप्रती आदर आणि सामाजिक समतेचा विचार नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.